सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भः**- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक- सीसीटी -३६२५ प्र.क्र.१२६/ ई-१२०३२०२/ पोल-३, दि.०९/०२/२०२६

**विषयः**-पुणे शहर सीसीटीव्ही प्रकल्प फेज-२ System Integrator M/s.Allied Digital Services Ltd. Mumbai यांच्या Milestone ४च्या कामाच्या रु. २८,७७,८७,३५०/-इतक्या रकमेच्या देयकास मान्यता देणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन,गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक-शासन निर्णय क्रमांक-सीसीटी-३६२५ प्र.क्र.१२६/ई-१२०३२०२/पोल-३, दि.९/२/२०२६, प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२०९१६०५३७१३२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 11-02-2026 23:10:53

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
कार्यासन अधिकारी, का.क्र. १७

प्रत :-
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पुणे शहर सीसीटीव्ही प्रकल्प फेज-२ System Integrator M/s. Allied Digital Services Ltd. Mumbai यांच्या Milestone ४ च्या कामाच्या रू.२८,७७,८७,३५०/- इतक्या रकमेच्या देयकास मान्यता देणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
## शासन निर्णय क्रमांकः सीसीटी-३६२५/प्र.क्र.१२६/ई-१२०३२०२/पोल-३

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : ०९ फेब्रुवारी, २०२६

**वाचा :**

१. शासन निर्णय,गृह विभाग क्र. आयएसएस-१००९/प्र.क्र.३१३/विशा-४,दि.२७ जुलै,२०११.
२. पोलीस आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र. प्रशा-६/सीसीटीव्ही कॅमेरा/७८४२/२०१२,दि.७.८.२०१२.
३. शासन निर्णय, गृह विभाग, क्र.आयएसएस-१०१२/प्र.क्र.७१/विशा-४, दि.१४.१०.२०१३
४. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि. ९.१०.२०२३, दि.८.१.२०२४, दि.३०.९.२०२४, दि.१३.२.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं-१७१६-३६१५/प्र.क्र.२८६/३९, दि.९.८.२०१६, दि.२०.३.२०१८, दि.९.५.२०१९, दि.५.१०.२०२३
६. शासन निर्णय, वित्त विभाग, महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०२३ दि.१२.४.२०२३.
७. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१०/२४/कोषा.प्रशा-५,दि.१४.२.२०२४
८. शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण ३६२३/प्र.क्र.५०/पोल-३,दि.२६.२.२०२४ व दि.२८.४.२०२५
९. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५.
१०. संचालक, अलाईड डिजिटल यांचे पत्र क्र. ADSL/PCS-२/२५-२६/०२५०, दि.२४/०९/२०२५.
११. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी-३६२५/प्र.क्र.१२६/ई-१२०३२०२/पोल-३,दि. १४/०८/२०२५ व दि. २०/११/२०२५.
१२. पोलीस आयुक्त, पुणे यांचे पत्र जा.क्र. पशा-६/CCTV फेज-२/M-४/देयक/मंजुरी/२०२५, दि. १३/१०/२०२५.
१३. पोलीस महासंचालक कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/१७/६१६२/पुणे शहर सीसीटीव्ही/३५/२०२१, दि.०२.१२.२०२५.
१४. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पूरक-२०२५/प्र.क्र.८४/अर्थ-३, दि. ०५/०१/२०२६

**<u>प्रस्तावना :</u>**

पुणे येथे दि.१.८.२०१२ रोजी झालेल्या बॉम्ब स्फोटाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे गरजेचे होते. त्यानुषंगाने गृह विभाग, शासन निर्णय दि.२७.७.२०११ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीमार्फत आवश्यक निविदा प्रक्रिया पार पाडून अंतिम निविदाकाराची निवड केली. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे

अधिनस्त पुणे व पिंपरी -चिंचवड शहरांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्याबाबत मे.अलाईड डिजीटल सर्व्हीसेस लि.कंपनीला दि.१७.९.२०१३ रोजी इरादापत्र (Letter of intent) देण्यात आले होते. गृह विभाग, शासन निर्णय दि.१४.१०.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर प्रकल्पास व त्यासाठी येणाऱ्या रु.२२५ कोटी इतक्या रक्कमेच्या खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. पुणे व पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्प दि.२७.१०.२०१५ रोजी कार्यान्वित (Go-Live) झाला आहे.

२. तद्नंतर पुणे शहर आयुक्तालयांतर्गत सीसीटीव्ही फेज-२ रु.४३८.२२ कोटीच्या खर्चाच्या (सविस्तर प्रकल्प अहवाल) DPR-RFP ला गृह विभागाच्या दि. २६.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली. पोलीस आयुक्तालय, पुणे शहर यांचे कार्यक्षेत्रामध्ये सुरक्षेच्या दृष्टीने पुणे शहर सीसीटीव्ही फेज-२ प्रकल्प अंतर्गत फेज-१ व फेज-२ मिळून एकत्रित १४४५ ठिकाणी ४२२७ सीसीटीव्ही कॅमेरे उभारण्याकरिता System Integrator M/s. Allied Digital Services Ltd. Mumbai यांना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून दि.०४.१०.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश (Work Order) देण्यात आले आहेत. त्यानंतर पुणे शहर सीसीटीव्ही फेज-२ च्या कामासाठी रक्कम रु.४३३,४४,३४,०२०/- (जीएसटीसह) व पुणे शहर हद्दीतील येत असलेले घाट, टेकडी, डोंगर व निर्जन क्षेत्र अशा ठिकाणच्या ब्लॅक स्पॉटवर Night Vision CCTV कॅमेरे लावण्याकरिता अतिरिक्त मंजूर जीएसटीसह रु.७९.४० कोटीच्या खर्चाचा समावेश करुन एकत्रित रक्कम रु.५१२,८४,३४,०२०/- जीएसटीसह इतक्या रकमेच्या कामास दि.२८.४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

३. पुणे सीसीटीव्ही प्रकल्पाच्या कामासंदर्भात M/s Allied Digital Services Ltd. Mumbai (System Integrator) यांनी Milestone १, २ व ३ च्या अनुषंगाने सादर केलेली देयके अदा करण्यास उपरोक्त संदर्भाधीन क्र. ११ येथील दि.१४/०८/२०२५ व दि. २०/११/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

४. पुणे सीसीटीव्ही प्रकल्पाच्या कामासंदर्भात M/s. Allied Digital Services Ltd., Mumbai यांनी डेटा सेंटर संबंधित कॉम्पुट व स्टोरेजचा पुरवठा व उभारणी, नियंत्रण कक्ष, मोबाईल व्हॅन तसेच, ड्रोन यांचा सुध्दा पुरवठा व उभारणी केली असल्याने Milestone-४ च्या अनुषंगाने (Supply & Installation of Compute & Storage Infrastructure for set-up at the Data Centre, Command Center & Mobile Vans, Drones) याबाबतच्या कामाचे रू. २८,९४,४१,३००.७१/- इतक्या रकमेचे देयक सादर केले होते.

५. पुणे सीसीटीव्ही प्रकल्पाचे कंत्राटदार/पुरवठादार (SI) यांनी Milestone-४ मधील कामास दोन दिवस विलंब केल्याने त्यांना देय असलेल्या रकमेतून प्रतिदिन ०.८५ टक्के प्रमाणे दंडाची आकारणी केली आहे (Penalty for delay of २ days @ ०.२८५% / day = ०.५७%). त्यानुसार जीएसटी वगळता पुरवठादारास देय असलेल्या रू. २४,५२,८९,२३७.८९/- इतक्या रकमेतून रू. १४,०१,६५२.७९/- इतकी दंडाची रक्कम कपात करून रू.२४,३८,८७,५८५/- इतकी रक्कम व त्यावरील जीएसटी रक्कम रू. ४,३८,९९,७६५/- अशी एकूण रू.२८,७७,८७,३५०/- इतकी रक्कम देय असल्याचे प्रकल्प सल्लागार PwC यांनी पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना दि. २५ सप्टेंबर, २०२५ रोजी ई-मेलद्वारे कळविले आहे. M/s. Allied

Digital Services Ltd., Mumbai यांचे पुणे सीसीटीव्ही प्रकल्पाच्या कामासंदर्भात Milestone-४ चे रू. २८,७७,८७,३५०/- इतक्या रकमेचे देयक अदा करण्यास मान्यता देऊन निधी वितरित करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी अपर पोलीस महासंचालक (नि व सं.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत शासनास सादर केला आहे.

६. पुणे शहर सीसीटीव्ही प्रकल्प फेज-२ System Integrator M/s. Allied Digital Services Ltd. Mumbai यांचे डेटा सेंटर संबंधित कॉम्पुट व स्टोरेजचा पुरवठा व उभारणी, नियंत्रण कक्ष, मोबाईल व्हॅन तसेच, ड्रोन यांचा सुध्दा पुरवठा व उभारणी केली असल्याने Milestone-४ च्या अनुषंगाने रू. २८,७७,८७,३५०/- (अक्षरी रूपये अठ्ठावीस कोटी सत्त्याहत्तर लाख सत्याऐंशी हजार तीनशे पन्नास फक्त) (जीएसटीसह) इतक्या रकमेचे देयक मंजुरी देण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

## शासन निर्णय :-

पोलीस महासंचालक कार्यालयाने दि.०२.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे प्रस्तावित केल्यानुसार पुणे शहर सीसीटीव्ही प्रकल्प फेज-२ System Integrator M/s. Allied Digital Services Ltd. Mumbai यांचे डेटा सेंटर संबंधित कॉम्पुट व स्टोरेजचा पुरवठा व उभारणी, नियंत्रण कक्ष, मोबाईल व्हॅन तसेच, ड्रोन यांचा सुध्दा पुरवठा व उभारणी (Supply & Installation of Compute & Storage Infrastructure for set-up at the Data Centre, Command Center & Mobile Vans, Drones) केली असल्याने Milestone-४ च्या अनुषंगाने रू. २८,७७,८७,३५०/- (अक्षरी रूपये अठ्ठावीस कोटी सत्त्याहत्तर लाख सत्याऐंशी हजार तीनशे पन्नास फक्त) (जीएसटीसह) इतक्या रकमेचे देयक अदा करण्यास याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदरहू रक्कम आहरीत करण्यासाठी पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना नियंत्रक अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कार्यालय अधीक्षक, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना घोषित करण्यात आले आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च हा "मागणी क्र. बी-१०, ४०५५- पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००)(०९) सीसीटीव्ही संनियंत्रण यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) योजनेतर योजना-५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर देयक पुणे सीसीटीव्ही प्रकल्पाच्या करारनाम्यात नमूद केल्यानुसार यासाठी लागू असलेल्या सर्व प्रचलीत कर व इतर वजाती वसूल करुन अदा करण्यात यावे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५ मधील वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग-दोन, मधील अ.क्र.२७ (अ) नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार, तसेच शासन परिपत्रक वित्त विभाग दि.०७/०४/२०२५ व दि. ०५/०१/२०२६ अनुसार व वित्त विभागाच्या

अनौपचारिक संदर्भ क्र.११८/२०२६/व्यय-७, दि.०६.०२.२०२६ अन्वये सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०२०९१६०५३७१३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.02.09 16:06:50 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे.
७. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, पुणे.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
९. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.
१०. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१२. मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि., प्रिमाईसेस नं. १३-ए, १३ वा मजला, अर्नेस्ट हाऊस, बॅकबे रेक्लेमेशन, एनसीपीए रोड, ब्लॉक III,नरिमन पाईंट, मुंबई-२१.
१३. अवर सचिव (व्यय-७/ वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. कक्ष अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवडनस्ती, पोल-३.